# जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
# तलाठी भरती लेखी परीक्षा-२०१४

**प्र.१. केंद्र सरकारला सर्वात जास्त महसूल कोणत्या करापासून मिळतो?**
(१) उत्पादन शुल्क (२) सीमा शुल्क (३) दंड शुल्क (४) आयकर

**प्र.२. ग्रामपंचायतीचे सरपंच यांची निवड कोण करतात?**
(१) ग्रामपंचायतीचे सर्व मतदार (२) सभापती, पंचायत समिती
(३) ग्रामपंचायतीचे सदस्य (४) जिल्हाधिकारी

**प्र.३. पेट्रोलला लागलेली आग विझवण्यासाठी कोणत्या वायूचा वापर करतात?**
(१) ऑक्सिजन (२) निऑन
(३) कार्बन डायऑक्साईड (४) नाइट्रोजन

**प्र.४. मराठवाड्याला वरदान ठरणाऱ्या जायकवाडी प्रकल्पाचा फायदा कोणत्या जिल्ह्यास मिळत नाही?**
(१) परभणी (२) बीड (३) औरंगाबाद (४) लातूर

**प्र.५. 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल' ही चळवळ खालीलपैकी कशाशी संबंधित आहे?**
(१) वन्यप्राणी (२) मानवी हक्क संरक्षण
(३) जागतिक शांतता (४) जागतिक एकात्मता

**प्र.६. जगातील पहिल्या महिला पंतप्रधान कोण?**
(१) मार्गारेट थैचर (२) इंदिरा गांधी
(३) सिरिमाओ बंदारनायके (४) बेनजीर भुट्टो

**प्र.७. ७३ वी घटनादुरुस्ती केव्हापासून लागू झाली?**
(१) २४ एप्रिल १९९२ (२) २४ एप्रिल १९९३
(३) २४ एप्रिल १९९४ (४) ०१ मे १९९३

**प्र.८. भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्क कोणत्या देशाच्या राज्यघटनेवरून घेतले आहे?**
(१) रशिया (२) इंग्लंड
(३) फ्रेंच व अमेरिका (४) आयरिश व म्यानमार

**प्र.९. भारतात कलेक्टर पदाची शिफारस कोणी केली?**
(१) लॉर्ड माऊंटबॅटन (२) वॉरन हेस्टिंग्ज (३) लॉर्ड मेयो (४) कॉर्नवालिस

**प्र.१०. कोणत्या या मराठी संतांच्या रचना 'गुरुग्रंथसाहिब' या पवित्र ग्रंथात समाविष्ट आहेत?**

(१) संत जनाबाई (२) संत चोखामेळा

(३) संत गोरोबा (४) संत नामदेव

**प्र.११. फोल्डरमधील सर्व फाईल्स एकाचवेळी सिलेक्ट करताना खालीलपैकी कोणत्या की चा वापर करतात?**

(१) Ctrl + C (२) Ctrl + V (३) Ctrl + A (४) Ctrl + X

**प्र.१२. ऑप्टिकल फायबर खालीलपैकी कोणत्या तत्त्वावर कार्यशील आहे?**

(१) संपूर्ण आंतरिक परावर्तन (२) अपवर्तन

(३) विलीकरण (४) व्यतीकरण

**प्र.१३. कोणत्या राज्यात द्विगृही कायदेमंडळ नाही?**

(१) महाराष्ट्र (२) उत्तर प्रदेश (३) पश्चिम बंगाल (४) पंजाब

**प्र.१४. घटकराज्यांच्या सीमा बदलण्याचे अधिकार ...... यांच्याकडे आहेत.**

(१) राष्ट्रपती (२) राज्याचे मुख्यमंत्री

(३) भारतीय संसद (४) सर्वोच्च न्यायालय

**प्र.१५. भारत स्वतंत्र होत असताना भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष कोण होते?**

(१) पंडित नेहरू (२) जे. बी. कृपलानी

(३) सरदार पटेल (४) राजेंद्रप्रसाद

**प्र.१६. 'गर्भलिंग चाचणी प्रतिबंधक' कायदा केव्हा करण्यात आला?**

(१) १९८१ (२) १९९४ (३) २००४ (४) २०१२

**प्र.१७. भारत सरकारने रुपयाचे अवमूल्यन केल्यास भारतीय वस्तू......**

(१) परदेशातील उपभोक्त्यांना महाग मिळेल. (२) देशातील उपभोक्त्यांना महाग मिळेल.

(३) देशातील उपभोक्त्यांना स्वस्त मिळे. (४) परदेशातील उपभोक्त्यांना स्वस्त मिळेल.

**प्र.१८. केंद्रसरकारच्या उत्पन्नातील राज्यसरकारांचा वाटा ..... च्या शिफारशीनुसार निश्चित केला जातो?**

(१) नियोजनमंडळ (२) सार्वजनिक लेखासमिती

(३) वित्तआयोग (४) राष्ट्रीय विकास परिषद

**प्र.१९. राज्यसरकारच्या महसुलात खालीलपैकी कशाचा वाटा सर्वाधिक असतो?**

(१) अबकारी कर (२) विक्रीकर (३) जमीन महसूल (४) संपत्ती कर

**प्र.२०. भाववाढीचा सर्वाधिक परिणाम खालीलपैकी कोणत्या घटकावर होतो?**

(१) सर्वोच्च उत्पन्न गट (२) दारिद्र्य रेषेखालील

(३) औद्योगिक उत्पादन (४) संघटित कामगार

**प्र.२१. तलाठी कार्यालयास...... म्हणतात.**

(१) ग्रामपंचायत कार्यालय (२) सजा कार्यालय
(३) अंगणवाडी (४) यापैकी नाही

**प्र.२२. शेतकऱ्यांच्या खातेदार नोंदवहीचा गावनमुना कोणता?**

(१) गावनमुना - ७ (२) गावनमुना - ६ (३) गावनमुना - १ क (४) गावनमुना - ८ अ

**प्र.२३. पोलिस पाटलाची निवड कोण करतात?**

(१) पोलिस अधीक्षक (२) जिल्हाधिकारी
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी (४) उपविभागीय अधिकारी

**प्र.२४. ग्रामदक्षता समितीचे सदस्य सचिव कोण असतात?**

(१) ग्रामसेवक (२) तलाठी (३) कोतवाल (४) पोलिस पाटील

**प्र.२५. ७/१२ या जमिनीबाबतच्या अभिलेखामध्ये बँकेच्या कर्जाची नोंद कुठे घेतली जाते?**

(१) अधिकार अभिलेख (मालकी हक्क) (२) इतर अधिकार
(३) पीक नोंद (४) यापैकी नाही.

**In the following passages some words (26-30) have been left out. First read the passage over and try to understand what it is about. Then fill in the blanks with the help of the alternatives given. Mark your answer in the answer-sheet.**

**(26)...... accordance with the banks tradition, the management has continued to encourage the extra-curricular activities (27) ...... emplyees. You will be (28)...... to know that our bank won the first prize (29) ...... the one-act play competition. Sri Prassanna Rao won the prize (30)...... the best actor.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **प्र.२६.** | (१) for | (२) with | (३) in | (४) to |
| **प्र.२७.** | (१) with | (२) about | (३) to | (४) for |
| **प्र.२८.** | (१) with | (२) about | (३) entitled | (४) pleased |
| **प्र.२९.** | (१) for | (२) in | (३) as | (४) with |
| **प्र.३०.** | (१) for | (२) with | (३) of | (४) in |

**In the following questions (31-35) find cut which part of sentences has an error.**

**प्र.३१.** The government propose / to build a dam / for electricity generation and / irrigation purposes.

(१) A (२) B (३) C (४) D

**प्र.३२.** Have you been less rash / the party would / not have ended / in a fiasco.

(१) A (२) B (३) C (४) D

प्र.३३. <u>No man can become</u> / <u>a great artist</u> / <u>unless he applies</u> / <u>himself contionuously to his art.</u>

(१) A (२) B (३) C (४) D

प्र.३४. <u>It is the mad</u> / <u>craze for speed</u> / <u>that is responsible</u> / <u>for much motor accidents</u>.

(१) A (२) B (३) C (४) D

प्र.३५. <u>It useless</u> / <u>to offer bread</u> / <u>to a man who</u> / <u>is dying to thirst.</u>

(१) A (२) B (३) C (४) D

**In the following question (36-40) choose the word which is the exact opposite of the given word.**

प्र.३६. **Malignant:**

(१) Virulent (२) Prime (३) Benign (४) Swallow

प्र.३७. **Insipid:**

(१) Tasty (२) stupid (३) Discreet (४) Feast

प्र.३८. **Deficit:**

(१) Explicit (२) Implicit (३) Surplus (४) Superfluous

प्र.३९. **Pacify:**

(१) Injure (२) Offend (३) Aggravate (४) Insult

प्र.४०. **Absolve:**

(१) Bless (२) Blame (३) Melt (४) Repent

**In the following question (41-45) choose the word which best expresses the meaning of the given word.**

प्र.४१. **Fiction:**

(१) Imaginary (२) Tamed (३) Novel (४) Wilderness

प्र.४२. **Eventually:**

(१) Suddenly (२) Ultimately (३) Quickly (४) Abruptly

प्र.४३. **Congregation:**

(१) Succession (२) Progression (३) Assemblage (४) Patronage

प्र.४४. **Precinct:**

(१) Religion (२) Priest (३) Vicinity (४) Preceding

प्र.४५. **Impostor:**

(१) Inventor (२) Pretender (३) Foreigner (४) Specialist

**In the following question (46-50) choose correct word, which subsitutes the sentence or the phrase:**

**प्र.४६. A remedy for all diseases ......**

(१) Narcotics (२) Antiseptic (३) Panacea (४) Tonic

**प्र.४७. One who talks continuously ......**

(१) Avaricious (२) Voracious (३) Loquacious (४) Impecunious

**प्र.४८. A person who hates the institution of marriage ......**

(१) Misologist (२) Misogamist (३) Misogynist (४) Philogynist

**प्र.४९. That which cannot be seen through ......**

(१) Transparent (२) Translucent (३) Pedantic (४) Opaque

**प्र.५०. Not suitable to be eaten ......**

(१) Inexorable (२) Inept (३) Infernal (४) Inedible

**खालील वाक्यांचे प्रयोग ओळखा.**

**प्र.५१. वर्गात नोटीस फिरवली जाईल.**

(१) अकर्मक कर्तरी प्रयोग (२) नवीन कर्मणी प्रयोग
(३) भावे प्रयोग (४) कर्तरी प्रयोग

**प्र.५२. मला उद्या गावाला जायचे आहे.**

(१) कर्मणी प्रयोग (२) कर्तरी प्रयोग
(३) सकर्मक भावे प्रयोग (४) अकर्मक भावे प्रयोग

**प्र.५३. खालीलपैकी कर्मणी प्रयोग असलेले वाक्य निवडा.**

(१) काकाने पुतण्याला वाढवले. (२) झाड फुलांनी बहरले.
(३) डॉक्टरांनी औषधे दिली. (४) तू आता गप्प बसावे.

**प्र.५४. वाक्यातील ज्या शब्दावरून क्रियेचे स्थान किंवा काळ याचा बोध होतो त्या शब्दाची विभक्ती कोणती?**

(१) षष्ठी (२) चतुर्थी (३) पंचमी (४) सप्तमी

**प्र.५५. 'आजच मी गावाहून आलो.' या वाक्यातील विभक्ती ओळखा.**

(१) पंचमी (२) सप्तमी (३) षष्ठी (४) तृतीया

**प्र.५६. चा, ची, चे, हे प्रत्यय कोणत्या विभक्तीत येतात.**

(१) द्वितीया (२) षष्ठी (३) सप्तमी (४) चतुर्थी

**प्र.५७. 'सिंह' या शब्दातील अनुस्वाराचा उच्चार ज्या शब्दातील अनुस्वारासमान होतो, त्या शब्दाचा पर्याय निवडा.**

(१) पतंग (२) वंदन (३) श्रीखंड (४) संशय

प्र.५८. 'गरजेनुसार' या शब्दाचा संधीविग्रह खालीलपैकी कोणता?

(१) गरज + नुसार (२) गरज + अनुसार (३) गरजे + नुसार (४) गरजनु + सार

प्र.५९. 'वाक्पती' या शब्दाचा संधीविग्रह खालीलपैकी कोणता?

(१) वाक् + पति (२) वाग् + पति (३) वाक् + पती (४) वाक्य + पति

प्र.६०. 'अधः + पतन' यापासून योग्य शब्द तयार करा.

(१) अधीपतन (२) अधोपतन (३) अधिपतन (४) अध:पतन

प्र.६१. दिलेल्या पर्यायामधील विसर्ग संधीचे उदाहरण कोणते?

(१) विपत्काल (२) सच्चित् (३) उज्ज्वल (४) विपत्काला

प्र.६२. दिलेल्या पर्यायामधील विसर्ग संधीचे उदाहरण कोणते?

(१) विपत्काल (२) वाग्विहार (३) निस्तेज (४) वाङ्‌निश्चय

प्र.६३. 'निष्पाप' हा शब्द ज्या संधी नियमानुसार तयार झालेला आहे त्याच नियमानुसार तयार झालेला शब्द कोणता?

(१) सच्चरित्र (२) दुष्काळ (३) पुरस्कार (४) दु:ख

खालील शब्दाचे समानार्थी शब्द ओळखा.

प्र.६४. विपिन

(१) उपवन (२) हिरण्य (३) अवटी (४) सारस

प्र.६५. व्योम

(१) कांतार (२) व्यान (३) वितान (४) क्षमा

प्र.६६. अनिल

(१) मत्स्य (२) मंडूक (३) वरुण (४) समीरण

प्र.६७. वल्लरी

(१) पान (२) देवता (३) स्त्री (४) लता

खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द ओळखा.

प्र.६८. निरभ्र

(१) सौरभ (२) अंबर (३) अभ्र (४) अभ्राच्छादित

प्र.६९. अग्रज

(१) अनुज (२) गज (३) गुप्त (४) शांत

प्र.७०. आगमन

(१) आचमन (२) आक्रमण (३) आरोहण (४) गमन

प्र.७१. मोजक्या शब्दात सांगितलेले तत्त्व ......

(१) सूत्र (२) ओवी (३) स्मृती (४) मंत्र

प्र.७२. दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा.....

(१) मनमौजी (२) मनमोहक (३) मनकवडा (४) महर्षी

प्र.७३. देवापुढे सतत तेवत असणारा दिवा......

(१) नंदादीप (२) दीप (३) दीपज्योत (४) समई

प्र.७४. आपल्या वेळची परिस्थिती बदलून तिला योग्य वळण लावणारा ......

(१) मूळपुरुष (२) सत्पुरुष (३) शूरपुरुष (४) युगपुरुष

प्र.७५. चांदण्या रात्रीचा पंधरवाडा ......

(१) शुक्लपक्ष (२) कृष्णपक्ष (३) पितृपक्ष (४) वद्यपक्ष

प्र.७६. १६ संख्यांची सरासरी १९ आहे. प्रत्येक संख्येस २ ने भागून तयार झालेल्या नवीन संख्यासंचाची सरासरी काढा.

(१) ८.० (२) ८.५ (३) ९.० (४) ९.५

प्र.७७. $\frac{१}{१०}, \frac{१}{१००}, \frac{१}{१०००००}$ ची सरासरी किती?

(१) ०.०३६६७ (२) ०.०११११ (३) ०.०२१२७ (४) ०.०२७७७

प्र.७८. एका वर्गातील मुली व मुलांची सरासरी वजन ३८ कि.ग्रॅ. आहे. मुलांची सरासरी वजन ४२ कि.ग्रॅ. व मुलींचे ३३ कि.ग्रॅ. आहे. जर मुलांची संख्या २५ असेल, तर मुलींची संख्या किती?

(१) ३८ (२) ४० (३) २५ (४) २०

प्र.७९. एका फलंदाजाची धावांची सरासरी २१.७५ आहे. नंतरच्या तीन डावात त्याने २८,३४ व ३७ धावा केल्या व त्याची सरासरी १.१२५ ने वाढली, तर तो एकूण किती डाव खेळला?

(१) २८ (२) ३४ (३) ३७ (४) ३०

प्र.८०. एका विद्यार्थ्यास परीक्षेत २०% गुण मिळाले व तो १० गुणांनी अनुतीर्ण झाला. दुसऱ्या विद्यार्थ्यास ४२% गुण मिळाले व तो १ + गुण मिळवून उत्तीर्ण झाला, तर परीक्षेचे एकूण गुण किती?

(१) ४० (२) १०० (३) ६० (४) ५०

प्र.८१. एका वर्गात काही विद्यार्थी आहेत. त्यापैकी $\frac{२}{३}$ गणितात, $\frac{३}{४}$ शास्त्रात, $\frac{५}{६}$ मराठीत हुशार आहेत, तर खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

(१) सर्वात जास्त गणितात हुशार.

(२) निदान $\frac{१}{२}$ विद्यार्थी गणित व शास्त्र दोन्हीत हुशार.

(३) गणितात शास्त्रापेक्षा हुशार.

(४) $\frac{३}{४}$ गणित, शास्त्र, मराठी या तिन्हीत हुशार.

प्र.८२. A ते Z या वर्णमालेतील अक्षरांची आकड्यांची बेरीज किती?

(१) ४०० (२) २५२ (३) ३५१ (४) २६

**प्र.८३. ६ वाजून ५४ मि. वाजता घड्याळातील मिनीट व तास काटा यात किती अंशांचा कोन असेल?**

(१) १५२° (२) ११७° (३) १८०° (४) ६०°

**प्र.८४. सर्व विद्यार्थी मुलगे आहेत. सर्व मुलगे खेळाडू आहेत.**

**– वरील विधानावरून खालीलपैकी कोणता निष्कर्ष निश्चितपणे निघतो?**

(१) सर्व खेळाडू मुलगे आहेत. (२) सर्व मुलगे विद्यार्थी आहेत.

(३) सर्व खेळाडू विद्यार्थी आहेत. (४) सर्व विद्यार्थी खेळाडू आहेत.

**प्र.८५. जर BELIEF म्हणजे AFKJDG, तर SELDOM म्हणजे काय?**

(१) REKFNP (२) PRKFNP (३) SPKFNP (४) REKENN

**प्र.८६. वर्णाक्षराचे स्थानिक मूल्य लक्षात घेत BEAT ह्या शब्दाचा गुणाकार २०० येईल, तर BOAT या शब्दाचा गुणाकार काय होईल?**

(१) ४२४ (२) २०० (३) ८०० (४) ६००

**प्र.८७. एका सांकेतिक भाषेत WOMEN हा शब्द 13567 असा लिहितात, तर त्याच भाषेत MEN हा शब्द कसा लिहाल?**

(१) 675 (२) 567 (३) 167 (४) 756

**प्र.८८. ? G, H, J, M, Q, ?**

(१) D,S (२) B,T (३) G,V (४) F,S

**प्र.८९. ५, २४, ४७, ७६, ?**

(१) ९६ (२) १०७ (३) ९३ (४) ११७

**प्र.९०. ९५, ११६, १३९, १६४, १९१ ......?**

(१) २१७ (२) २४५ (३) २२० (४) २१६

**सूचना– खालील प्रश्न क्र. ९१ ते ९५ दिलेल्या उताऱ्यात दिलेली माहिती काळजीपूर्वक तपासा आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधा.**

अर्थशास्त्र, इतिहास, संख्याशास्त्र, इंग्लिश आणि गणित या पाच विषयांवर गेस्ट लेक्चर सोमवार ते शुक्रवार या आठवड्यात आयोजित करावयाचे आहे. एके दिवशी फक्त एकच लेक्चर आयोजित करता येते. इकॉनॉमिक्सचे लेक्चर मंगळवारी आयोजित करता येत नाही. इतिहासची फॅकल्टी फक्त मंगळवारी उपलब्ध आहे. गणिताचे लेक्चर अर्थशास्त्राच्या लेक्चरनंतर लगेचच आयोजित करावयाचे आहेत. इंग्लिशचे लेक्चर अर्थशास्त्राच्या लेक्चरच्यानंतर लगेच व संख्याशास्त्राच्या अगोदर आयोजित करावयाचे आहे.

**प्र.९१. सोमवारी कोणते लेक्चर आयोजित करण्यात आले होते?**

(१) इतिहास (२) अर्थशास्त्र (३) गणित (४) संख्याशास्त्र

**प्र.९२. संख्याशास्त्र आणि इंग्रजी यांच्या दरम्यान कोणते लेक्चर आयोजित करण्यात आले?**

(१) इतिहास (२) अर्थशास्त्र (३) गणित (४) यापैकी नाही

प्र.९३. आठवड्यात सर्वात शेवटचे लेक्चर कोणते?

(१) इतिहास (२) अर्थशास्त्रं (३) गणित (४) संख्याशास्त्र

प्र.९४. बुधवारी कोणते लेक्चर आयोजित करण्यात आले होते?

(१) इतिहास (२) अर्थशास्त्र (३) गणित (४) इंग्लिश

प्र.९५. अंकगणिताच्या अगोदर कोणते लेक्चर आयोजित करण्यात आले होते?

(१) इतिहास (२) अर्थशास्त्र (३) गणित (४) संख्याशास्त्र

प्र.९६. एका रांगेमध्ये X हा सुरुवातीपासून १४ वा आहे, तर Y हा शेवटून १७ वा आहे. Z हा X आणि Y च्या बरोबर मधे आहे. X हा, Y च्या पुढे असून दोघांच्यामध्ये ४८ व्यक्ती आहेत, तर X आणि Z या दोघांमध्ये किती व्यक्ती आहेत?

(१) ६ (२) ७ (३) ८ (४) ९

**खालील उतारा वाचा आणि त्यावरील प्रश्न क्रमांक ९७ ते ९९ यांची उत्तरे द्या.**

एका प्रस्तावासाठी लागू होणाऱ्या उपाययोजनेसाठी सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यात २८७८ व्यक्तींनी भाग घेतला. त्यापैकी १६५२ पुरुष होते. १२२६ व्यक्तींनी प्रस्तावाच्या विरोधी मत दिले. त्यापैकी ७९६ जण पुरुष होते. १४९५ व्यक्तींनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिले. १९६ महिलांनी कोणतेही मत दिले नाही.

प्र.९७. किती महिलांनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिले?

(१) ४३० (२) ६०० (३) ६२४ (४) ६४०

प्र.९८. किती पुरुषांनी मत दिले नाही?

(१) ३१ (२) २२७ (३) ४२६ (४) ५८१

प्र.९९. किती महिला प्रस्तावाच्या बाजूने नव्हत्या?

(१) ४३० (२) ४९६ (३) ५८६ (४) १२२६

प्र.१००. एका व्यक्तींच्या समूहात ७०% पुरुष आहेत आणि ४०% व्यक्ती अविवाहित आहेत. जर पुरुषांपैकी $\frac{३}{७}$ पुरुष विवाहित असतील, तर किती महिला अविवाहित आहेत?

(१) $\frac{२}{७}$ (२) $\frac{१}{३}$ (३) $\frac{३}{७}$ (४) $\frac{२}{३}$

## प्रश्नपत्रिका संग्रह - २९ (लेखी परीक्षा उत्तरसूची) परभणी

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | (४) | २ | (३) | ३ | (३) | ४ | (४) | ५ | (२) | ६ | (३) | ७ | (२) | ८ | (३) | ९ | (२) | १० | (४) |
| ११ | (३) | १२ | (१) | १३ | (४) | १४ | (३) | १५ | (२) | १६ | (३) | १७ | (४) | १८ | (३) | १९ | (२) | २० | (२) |
| २१ | (२) | २२ | (४) | २३ | (४) | २४ | (२) | २५ | (२) | २६ | (३) | २७ | (४) | २८ | (४) | २९ | (२) | ३० | (३) |
| ३१ | (१) | ३२ | (३) | ३३ | (३) | ३४ | (४) | ३५ | (४) | ३६ | (३) | ३७ | (१) | ३८ | (३) | ३९ | (३) | ४० | (४) |
| ४१ | (१) | ४२ | (२) | ४३ | (३) | ४४ | (३) | ४५ | (२) | ४६ | (३) | ४७ | (३) | ४८ | (२) | ४९ | (४) | ५० | (४) |
| ५१ | (२) | ५२ | (४) | ५३ | (३) | ५४ | (४) | ५५ | (१) | ५६ | (२) | ५७ | (४) | ५८ | (२) | ५९ | (२) | ६० | (४) |
| ६१ | (१) | ६२ | (३) | ६३ | (२) | ६४ | (३) | ६५ | (३) | ६६ | (४) | ६७ | (४) | ६८ | (४) | ६९ | (१) | ७० | (४) |
| ७१ | (१) | ७२ | (३) | ७३ | (१) | ७४ | (४) | ७५ | (१) | ७६ | (४) | ७७ | (१) | ७८ | (४) | ७९ | (४) | ८० | (४) |
| ८१ | (२) | ८२ | (३) | ८३ | (२) | ८४ | (४) | ८५ | (४) | ८६ | (४) | ८७ | (२) | ८८ | (३) | ८९ | (३) | ९० | (३) |
| ९१ | (४) | ९२ | (१) | ९३ | (३) | ९४ | (४) | ९५ | (२) | ९६ | (३) | ९७ | (२) | ९८ | (१) | ९९ | (१) | १०० | (४) |